

धुक्यामध्ये हरवलेलं सातपुडा पर्वत रांगेतील निसर्गरम्य हिलस्टेशन भिंगारा...

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे    अंक : ४०८    सोमवार    दि ०६ जुलै २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# निवडणूक आयोगाच्या पुनर्निरीक्षण निर्णयाचे मुख्यमंत्री फडणवीसांकडून स्वागत; विरोधक कव्हर फायर करत आहेत म्हणत लगावला टोला

नागपूर

देशभरात निवडणूक आयोगाकडून मतदार याद्यांचे एसआयआर (सिस्टेमॅटिक इलेक्टोरल रोल रिव्हिजन) करण्याची घोषणा होत असल्याची माहिती समोर आली असून, या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले आहे. त्यांनी सांगितले की, ङ्गही घोषणा लोकशाही मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे आणि मी याचे मन:पूर्वक स्वागत करतो.फ्फ फडणवीस म्हणाले की, मी स्वतः २०१२ साली उच्च न्यायालयात गेलो होतो. तेव्हा मी ही मागणी केली होती की मतदार याद्यांचे संपूर्ण पुनर्निरीक्षण झाले पाहिजे. मागील २५ वर्षांपासून केवळ संक्षिप्त पुनरनिरीक्षण चालू होते, पण संपूर्ण पुनरावलोकन होत नव्हते. त्यामुळे एसआयआर प्रक्रिया अत्यंत गरजेची होती. आता ती देशभर राबविली जाणार असल्याने मला खूप समाधान वाटते.फ्फ त्यांनी पुढे सांगितले की, एसआयआर प्रक्रियेनंतर मतदार याद्या ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित करण्यात याव्यात. यामुळे पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढेल. एखाद्या मतदाराने राज्य बदलले तरी त्याचा आयडी दुसऱ्या ठिकाणी कायम राहील, अशी सुसंगत प्रणाली तयार होणे आवश्यक आहे.फ्फ फडणवीस यांनी हेही नमूद केले की, ही प्रक्रिया झाल्यास मतदार नोंदीतील त्रुटी कमी होतील आणि मतदार यादी अधिक विश्वसनीय बनेल. या घोषणेच्या विरोधात विरोधक मोर्चा काढण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच, फडणवीस यांनी विरोधकांवर तीव्र टीका केली. त्यांनी म्हटले, विरोधक हे पूर्णपणे निराश झाले आहेत. त्यांना आधीच माहिती आहे की येणाऱ्या निवडणुकीत त्यांचा पराभव निश्चित आहे. त्यामुळे पराभव झाकण्यासाठी ते ङ्गकव्हर फायरफ करत आहेत.फ्फ ज्यांची नोट चोरी बंद झाली आहे, ते आता वोट चोरीचा आवाज लावत आहेत. पण हे लक्षात ठेवा, ये पब्लिक है, सब जानती है.फ जनतेला सर्व काही कळते आणि ती चुकीच्या प्रचाराला बळी पडणार नाही.फ्फ असा टोला फडणवीसांनी विरोधकांना लगावला. दरम्यान, फलटण आत्महत्येच्या प्रकरणावरून काँग्रेस नेते राहुल गांधींनी केलेल्या आरोपांना




उत्तर देताना फडणवीसांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, राहुल गांधी जे ट्वीट करतात ते त्यांना स्वतःलाच समजत नाहीत. त्यांना घटनेची संपूर्ण माहिती नसते. फलटण येथील महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणात तिने आपल्या हातावर लिहून ठेवले आहे, त्यामुळे प्रकरण स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात कुणालाही क्षमा दिली जाणार नाही.फडणवीसांनी काँग्रेसवर टीका करताना म्हटले की, दुर्दैवाने राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षातील लोक संवेदनशील घटनांमध्येही राजकारण करण्याची संधी सोडत नाहीत.या प्रकारच्या संवेदनशील घटनेतही पोळ्या भाजणं विसरत नाही, हे फार मोठ दुर्दैव आहे.

# मुंबई गिळायला ॲनाकोंडा मुंबईत आला होता; उद्धव ठाकरेंचा अमित शाहांवर हल्लाबोल

मुंबई

मुंबईमध्ये आज ठाकरेंच्या शिवसेनेचा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. वरळी डोममध्ये हा मेळावा पार पडत आहे. आज अमित शाहाही मुंबईमध्ये आहेत. त्यांनी आज मुंबईतील माझगाव डॉक येथे अत्याधुनिक नौकांचं लोकार्पण केलं आहे. याच मुद्याला धरून उद्धव ठाकरेंनी आजच्या भाषणातून केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांवर टीका केली आहे. त्यांनी अमित शाहांना ॲनाकोंडा म्हटलं आहे. उद्धव ठाकरे नेमकं काय म्हणालेत ते पाहूयात. मुंबईवरती कोणाचा डोळा आहे हे तुम्हाला माहिती आहे. खासकरुन दोन व्यापाऱ्यांचा, आजचं एकजण येऊन गेला, आज काय योगायोग आहे माहित नाही. सामनामध्ये दोन बातम्या पाहिल्या, एक पहिल्या पानावर आहे, ती म्हणजे भाजप कार्यालयाचं भूमिपूजन आणि दुसरी आतमध्ये आहे. जिजामाता उद्यानात लवकरचं ॲनाकोंडा येणार, आता आपण पेंग्विन आणले म्हणून लाखो पर्यटक वाढले, याचा मला अभिमान आहे. त्यावरून काही पेंग्विनच्या उंचीची आणि बुद्धीची माणसं आपल्यावर टीका करतात ते सोडून द्या. पण, ॲनाकोंडा म्हणजे सगळं गिळणारा साप. त्यांना मुंबई गिळायची आहे. बरं कशी गिळतोस तेच बघतो. नाही तुझं पोट फाडून बाहेर आलो तर नावाचा नाही,असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, भूमिपूजनाला आलास ना फोड ना नारळ, डोक्यावर फोड नाहीतर दगडावर फोड, एकच आहे. पण ते करतानासुद्धा घराणेशाहीवरती टीका. म्हणजे याचं कारटं क्रिकेट बोर्डावर मेरीटने झालंय, बरं घराणेशाही कोणाची ठाकरेंची? अरे उभा राहून दाखव समोर, म्हणून मला त्या अफदालीला सांगायचंय, की आम्ही आमच्या आईवडिलांचे ऋण माननारे पाईक आहोत. वारसदार आहोत. संजय राऊत म्हणाले तसं ब्रम्हचाऱ्यांची पिलावळ नाही, तुम्हा ब्रम्हचाऱ्यांना ४० पोरं झाली कशी? मला तुकाराम महाराजांचा अभंग आठवतो, तिचं परिस्थिती भाजपची झाली आहे. गाढवही गेलं आणि ब्रम्हचर्यही गेलं, अशी घणाघाणी टीका उद्धव ठाकरेंनी भाजप व मोदी- शाहांवर केली आहे. मुंबईमध्ये फक्त भगवाचं फडकवून दाखवणार




असं सांगायलाही ते विसरले नाहीत. दरम्यान, या मेळाव्याला पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती.

# किल्ले राजगड...



आठवते, मी मद्रदेशात (चेन्नैला) राहात होते तेव्हा आम्ही काहीजणी जिंजीला पोहोचलो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांना याच जिंजीच्या किल्ल्याने आश्रय दिला. स्वराज्याचे स्वप्न तेवते ठेवले. त्यामुळेही जिंजीच्या किल्ल्याविषयी मनात एक कृतज्ञता असते. माझ्या सोबतच्या मद्रसुंदऱ्यांना हा इतिहास ज्ञात असण्याचे कारण नाही आणि एकूणच किल्ला नामक प्रकरणच त्यांना माहीत नव्हते. प्रत्यक्षात जिंजीचा किल्ला तसा सुस्थितीत, किमान तेव्हा तरी होता. ठेंगणा, ठुसका, अनघड, सोपा. मात्र तो चढून आणि त्याच्या दर्शनाने मद्रदेशीय मैत्रिणींचे विस्फारलेले डोळे पाहून आम्हा मऱ्हाठी द्वयीला पायी तुडवलेल्या सह्याद्रीतल्या गड-किल्ल्यांचे स्मरण होऊन जिंजी उतरून, पार थकून येऊन बसलेल्यांचे नवल न वाटते तरच नवल! भर पावसाळ्यात हरिश्चंद्रगडाची वाट ज्याने पायाखाली मळवली आहे आणि कोकणकड्यावरून खाली दरीत डोकावून ज्या डोळ्यांनी पाहिले आहे त्या डोळ्यांसाठी जिंजीचा किल्ला इतिहास म्हणून मोठा होता पण थकून जाण्यासारखा कठीण नक्कीच नव्हता. त्या मात्र इतिहासापेक्षाही नुसत्या किल्ल्याच्या, गड चढल्याच्या कल्पनेनेच हरखल्या होत्या. आपल्याकडच्या सारखे गड-किल्ले, डोंगर त्यांना माहीत नाही आणि पाऊसही माहीत नाही! पाऊस असावा, धुवांधार पाऊस असावा आणि सह्याद्रीच्या कडेकपारीत एखादा गड जवळ करत पावले चालत असावी. त्यातही तो गड जर ङ्किल्ले राजगडफ असेल तर बातच न्यारी! मनातल्या मनात पावलं वारा होतात. भरारा राजगड चढू लागतात. हेच ते जुलैच्या सुरुवातीच्या पावसाचे दिवस. राजगडाच्या वाटा तुडवत सुवेळा माचीवरल्या नेढ्यात जाऊन मी पोहोचते. एका चांगल्या वेळेवर, सुमूहुर्तावर राजगडाच्या बांधकामाची सुरुवात या माचीच्या बांधकामापासून राजांनी केली म्हणून ही सु-वेळा माची. माचीच्या सुरुवातीला गवताळ उताराची आणि खडकाळ माथ्याची अशी ङ्कडुबाफ टेकडी, ती उजवीकडे ठेवून पुढच्या अंगाला एक भला मोठा बुरुज आणि पुढे एक खडकाळ अरुंद टेप. तटबंदी आहे. तटाच्या शेजारून टेपावर चढून वर हात-पाय-पाठ टेकत चढत जावे तर या खडकाळ टेपाच्या दगडात एक आरपार भोक दिसते. तेच ते सुवेळा माचीवरले ङ्कनेढेफ किंवा ङ्कवाघाचा डोळाफ. भन्नाट वारा. पाऊस येऊन-जाऊन आहे पण आत्ता ह्या क्षणी वातावरण लख्ख आहे. सूर्य माथ्यावरून कधीच सरला आहे, पण अजून बराच दिवस बाकी आहे. खालचा नक्की कुठला भाग नेढ्यातून दिसतो ते स्मरत नाही पण कुठला का दिसेना! हिरव्या रंगाची सारी जादू सभोवार पसरलेली. पावसाने जणू सारी धरती धुवून लख्ख् करून ठेवलेली. क्षितिजाच्या गोलाकार रेषेची आडवी कमान डोळ्यात साठवत, भणाण वारा अंगावर घेत नेढ्यात आपला डेरा जमवावा. आपण इतक्या उंचीवर की सारे काही खोल आपल्या पायथ्याशी असावे. खेळातले असावे असे शेताचे लहान लहान हिरवे-पिवळे चौकोन, काही वस्त्या, काही चित्रातली घरे. माणसे-जनावरे न दिसण्याएवढी होऊन गेलेली आणि रेषा-रेषांनी जमीन विभागलेली. इतक्या वर सुवेळाच्या नेढ्यात येऊन पोचल्याचा आनंद आहे आणि अवघी सृष्टी डोळ्यांत मावण्याइतकी लहान झाल्यामुळे डोळे विस्फारले आहेत. खुले मोकळे आभाळ आहे आणि पाठीला राजगडाच्या नेढ्याचा आधार आहे! सुख, सुख ते काय असावे? सुरुवातीचे औत्सुक्य संपते आणि लक्षात येते की पायाशी नेढ्यातच एक जुना मासिकाचा अंक कुणी विसरून गेला आहे. फडफडतो आहे. कुतुहलाने मी तो अंक उचलते तर तो असतो ङ्कसत्यकथाफ्चा जुना अंक. वाऱ्याने पाने फडफडतात आणि नेमकी कविता उघडते ती असते आरती प्रभुंची - ङ्कशून्य शृंगारतेफ आता सरी वळवाच्या ओसरू लागल्या; भरे निळी नवलाई जळीं निवळल्या. गंध गर्भ भुईपोटी ठेवोनि वाळली, भुईचंपकाची पाने कर्दळीच्या तळी. अजूनही कुठेतरी पिवळा पडलेला तो सत्यकथेचा अंक जपून ठेवलेल्या चीजांमध्ये सापडेलही माझ्याकडे. मला वाटते गुंजवणेहून एकामागोमाग एक असे दोन-तीन दरवाजे ओलांडून चोर दरवाज्याने चढून पद्मावती माचीवर पोहोचत असावे. ही स्वराज्याची पहिली राजधानी. उत्तरेतून राजगडावर आक्रमण करणे त्यामानाने सुकर आणि राजगडावर रायगडएवढी मोठी पठारी जागा नाही म्हणून पुढे राजधानी रायगडला हलवली. शिवराज्याभिषेक रायरी , म्हणजेच रायगडला झाला.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# आडाळी एमआयडीसीतील भूखंड हस्तांतरणावरील स्थगिती उठवली; गोव्यात होणार गुंतवणूक परिषद

**मुंबई/वृत्तसंस्था**

सावंतवाडी : दोडामार्ग तालुक्यातील आडाळी एमआयडीसीला चालना देण्यासाठी आणि उद्योजकांच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी मुंबईतील विधान भवन येथे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत आडाळी एमआयडीसीच्या विकासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

आडाळी एमआयडीसीमध्ये ज्या उद्योजकांनी यापूर्वी भूखंड खरेदी केले होते, त्यांना भूखंडांचा ताबा देणे, करार करून बांधकाम परवानगी देणे इत्यादी बाबींना स्थगिती देण्यात आली होती. आजच्या बैठकीत सदरची स्थगिती उठविण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला. तसेच, येथे नवीन भूखंड घेऊ इच्छिणाऱ्या उद्योजकांसाठी आगामी दोन आठवड्यांत ऑनलाईन भूखंड वाटप प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. याशिवाय, आडाळी एमआयडीसी परिसरातील प्रस्तावित गोल्फ कोर्स प्रकल्प रद्द करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.



एमआयडीसीमध्ये उद्योगधंदे व गुंतवणूक वाढावी आणि उद्योजक आकर्षित व्हावेत, यासाठी येत्या ऑगस्ट महिन्यामध्ये गोव्यात विशेष गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले आहे. सध्या एमआयडीसीचे मुख्य कार्यालय रत्नागिरी येथे असल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उद्योजकांना वारंवार रत्नागिरी येथे जावे लागत होते. ही गैरसोय दूर करण्यासाठी आता दर गुरुवारी एमआयडीसीच्या विभागीय कार्यालयातील अधिकारी आडाळी येथेच कार्यालयीन कामकाजासाठी उपलब्ध असणार आहेत.

बैठकीत पायाभूत सुविधांचा आढावा घेताना, आडाळी एमआयडीसीमधील विद्युत उपकेंद्राचे काम पूर्ण झाले असले, तरी इन्सुली ते आडाळी या पर्यायी ३३ केव्ही वीज वाहिनीचे काम संथ गतीने चालू असल्याबाबत चर्चा झाली. हे काम लवकरात लवकर जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. तसेच, आडाळी परिसराला लागून असलेल्या तिलारी पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याचा वापर करून डेटा सेंटर किंवा तत्सम मोठे उद्योग उभारण्याबाबत पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या बैठकीला उद्योग विभागाचे प्रधान सचिव, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) मुख्य कार्यकारी अधिकारी, सह मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य अभियंता, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे (ऑनलाईन), उद्योग विभागाचे सहसचिव, महाव्यवस्थापक (भूमी), प्रादेशिक अधिकारी व इतर संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## पोलीस ठाण्यातील कथित गोळीबार; कारवाई का नाही?

**नाशिक/वृत्तसंस्था**

अंबड पोलीस ठाण्यातील निरीक्षकांनी सहज म्हणून केलेल्या गोळीबाराच्या घटनेला महिना उलटला तरी त्यांच्यावर कोणतीही कारवाई का झाली नाही, असा प्रश्न आ. सीमा हिरे यांनी विधीमंडळात उपस्थित केला. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती नसतांना पोलीस ठाण्यातच गोळीबार होणे, ही घटना गंभीर असल्याने शासनाने या प्रकरणाच्या चौकशीसाठी तातडीने उच्चस्तरीय समिती नेमावी, अशी मागणी आमदार हिरे यांनी केली. दरम्यान, अंबड पोलीस ठाण्याच्या आवारात अशी काही घटना घडली होती की नाही, याबाबत पोलीस यंत्रणाही फारसे काही बोलण्यास तयार नाही. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे विचारणा केल्यावर त्यांनी या प्रकरणावर काहीही बोलण्यास नकार दिला.




सिडको परिसरात मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढली आहे. मारामाऱ्या, तोडफोड, सोनसाखळी चोरी यासह गंभीर गुन्हे रोजच घडत आहेत. सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक आदी लोकप्रतिनिधींशी पोलीस निरीक्षक राजपूत हे कायमच उर्मट भाषेचा वापर करतात, असा आरोपही आमदार हिरे यांनी केला आहे. राजपूत यांच्या मनमानी कार्यपध्दतीच्या विरोधात सिडकोवासियांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झालेले आहे. कथित गोळीबाराची घटना महिनाभरापूर्वीची असल्याकडे आ. सीमा हिरे यांनी लक्ष वेधले.

महिनाभरापूर्वी रात्री राजपूत हे काही मोजक्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह पोलीस ठाण्याच्या आवारात उभे होते. सहज म्हणून राजपूत यांनी गोळीबार केला. त्यावेळी गोळी लागून उपनिरीक्षक आणि हवालदार जखमी झाले. या घटनेला महिना उलटला तरी संबंधितावर कोणतीही कारवाई न झाल्याने आमदार हिरे यांनी विधीमंडळात याविषयी प्रश्न उपस्थित केला.

राजपूत यांना कोण आणि का पाठीशी घालत आहे, असा प्रश्नही त्यांनी केला. सदरची घटना लपविण्यासाठी पोलीस ठाण्यातील सीसी टीव्ही चित्रणही गायब झाले असण्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. शासनाने या प्रकरणाच्या चौकशीसाठी तातडीने उच्चस्तरीय समिती नेमून संबंधितावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार हिरे यांनी केली. पोलीस निरीक्षक राजपूत यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. दरम्यान, अंबड पोलीस ठाण्याच्या आवारातच गोळीबाराची घटना घडल्याचा आरोप करीत त्यात उपनिरीक्षक व कर्मचारी जखमी झाल्याची बाब स्थानिक आमदार हिरे यांनी विधीमंडळ अधिवेशनात मांडली.

## 'मलाही शिंदेंच्या शिवसेनेची ऑफर होती'

**सांगली/वृत्तसंस्था**

शिवसेना ठाकरे पक्षाचे पुण्यातील नेते वसंत मोरे यांनी एक मोठा दावा केला आहे. 'मलाही शिंदेंच्या शिवसेनेची ऑफर आली होती', असं वसंत मोरे यांनी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटलं आहे. "सध्या फक्त ऑपरेशनचीच चर्चा आहे. हे सगळे ऑपरेशन करता करता महाराष्ट्र आयसीयूमध्ये पोहोचला आहे, तरी या लोकांचं लक्षच नाहीये. या सर्व लोकांचं फक्त ऑपरेशन टायगर, ऑपरेशन तुतारी, ऑपरेशन ३.० असं सगळं सुरू आहे. पण दुसरीकडे महाराष्ट्र व्हेंटिलेटरवर गेला, यावर सत्ताधाऱ्यांचं लक्ष नाही. पुणे शहरात एवढे भाजपाचे नगरसेवक असतानाही एका-एका नगरसेवकालाही फोडण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत", असा आरोप वसंत मोरे यांनी केला. "सत्ताधारी या सर्व गोष्टी कशासाठी करत आहेत? सत्ताधाऱ्यांना विरोधी पक्षच नको आहे का? सत्ताधाऱ्यांना विरोधी पक्ष ठेवायचा नाहीये, म्हणजे लोकशाही संपून टाकायची आहे का? आता राज्यकर्त्यांनी हे राजकीय ऑपरेशन थांबवले पाहिजेत आणि



राज्याकडे लक्ष दिलं पाहिजे", असं वसंत मोरे यांनी म्हटलं आहे. तुम्हालाही ऑफर आहे का? असा प्रश्न विचारला असता वसंत मोरे म्हणाले की, "मला आता ऑफर नाही. पण मलाही शंभर टक्के आधी ऑफर आली होती. पुण्यातील एका माजी नगरसेवकाच्या माध्यमातून ही ऑफर आली होती. असं घडलं होतं की, तेव्हा मला तत्कालीन संपर्कप्रमुख सचिन अहिर आणि खासदार संजय राऊत यांचा फोन आला आणि मला सांगण्यात आलं की पुण्याचं शहर प्रमुख म्हणून उद्या आम्ही तुमचं नाव जाहीर करणार आहोत. पण त्याच दिवशी रात्री मला शिंदे सेनेकडून ऑफर आली होती", असा दावा वसंत मोरे यांनी केला.

## 'बाबा सिद्दीकींप्रमाणे माझा खून झाला तर मंदिरासाठी मी मागितलेला निधी तेवढा द्या'

**अकोला/वृत्तसंस्था**

काँग्रेसचे अकोला पश्चिम मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांना फेब्रुवारी २०२६ मध्ये जीवे मारण्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर पुन्हा एकदा त्यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. याचे पडसाद विधानसभेत उमटले. काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी हा विषय विधानसभेत मांडला आणि साजिद खान पठाण यांना सुरक्षा पुरविण्यात यावी, अशी मागणी केली. तसेच सरकारने मागेच या धमक्या गंभीरतेने घेतल्या असून त्याचा तपास सुरू असल्याचे सरकारच्या वतीने सांगण्यात आले. यानंतर स्वतः साजिद खान पठाण यांनी केलेल्या एका टिप्पणीची सध्या चर्चा आहे.



काँग्रेस नेते नाना पटोले, विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत हा मुद्दा उचलून धरताना एका आमदाराला टोळीकडून वारंवार धमकी मिळणे योग्य नसल्याचे म्हटले. यावर सरकारची भूमिका मांडताना नितेश राणे म्हणाले की, सदर धमकी सरकारने गंभीरपणे घेतली आहे. सभागृहातील एकाही सदस्याला मिळणारी धमकी खपवून घेतली जाणार नाही. आमदारांकडे जे पुरावे आहेत, ते पोलिसांकडे द्यावेत. त्यावर नक्की कारवाई होईल.

नाना पटोले यांनी सरकारचा दावा खोडून काढताना बिश्नोई गँग मुख्यमंत्र्यांचे ऐकत नाही, अशी टीका केली. "मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात आपली भूमिका मांडली, हे खरे आहे. गुंडांना सोडले जाणार नाही, त्यांच्यावर कारवाई करू, असे मुख्यमंत्र्यांनी सांगूनही काल पुन्हा साजिद खान पठाण यांना धमकी मिळाली. याचा अर्थ बिश्नोई गँग मुख्यमंत्र्यांचे ऐकायला तयार नाही", अशी टीका नाना पटोले यांनी केली. कॅबिनेट मंत्री शंभूराज देसाई यांनीही या विषयावर भाष्य केले. साजिद खान पठाण यांना ज्या मोबाइल क्रमाकांवरून धमकी आली आहे, त्याची माहिती त्यांनी अध्यक्षांना द्यावी. त्याची चौकशी सरकार करेल. तसेच आमदारांना संरक्षण देण्याच्या सूचना आयुक्तांना दिल्या जातील. जर संरक्षण वाढविण्याची गरज भासली तर पोलीस आयुक्तांच्या माध्यमातून तसा निर्णय घेतला जाईल, असे शंभूराज देसाई म्हणाले.

आमदार साजिद खान पठाण यांनी धमकीबाबत माहिती देताना म्हटले की, मला जेव्हा पहिल्यांदा धमकी आली होती, तेव्हा मुख्यमंत्री फडणवीसांनी मला रात्री १२ वाजता फोन केला होता. माझी चौकशी केली. पण काल पुन्हा मला धमकी आली. मी धमक्यांना घाबरत नाही. मी जर घाबरलो असतो तर मी काल घरातून बाहेर पडलो नसतो. पण माझी एक मागणी राहून जाईल, ते आधी मी सांगतो.

साजिद खान पठाण पुढे म्हणाले, "sउद्या जर बाबा सिद्दीकि प्रमाणे माझाही खून झाला तर मी मंदिरासाठी जो निधी मागितला होता. त्या मंदिराचे बांधकाम विधानसभा अध्यक्षांनी करून घ्यावे. मला सुरक्षा नको आहे, मी मंदिरासाठी जो निधी मागितला होता. तो देण्यात यावा."

# 1.53 कोटींची इलेक्ट्रिक बसच चोरली! बस चोराची 'ही' कार्यपद्धती पाहून पोलीसही चक्रावले

**अमरावती/वृत्तसंस्था**

चोरीच्या अनेक घटनांची नोंद पोलीसदप्तरी होत असते. चोरटे हे शेतातील मोटरपंपापासून ते महागड्या दागिन्यांची चोरी करतात. मंदिरातही चोरी होते. अयोध्येतील राम मंदिरातील चोरीची चर्चा देशभर सुरू आहे. पण, एका चोराने चक्क एसटी महामंडळाची बस चोरण्याचा विचार केला आणि तो अमलातही आणला. पोलिसांनी कारवाई करीत या चोरट्याला जेरबंद केले. चोरल्या गेलेल्या या 'शिवाई' बसची किंमत १.५३ कोटी रुपये इतकी आहे. या चोराने चौकशीदरम्यान दिलेली माहिती ऐकून पोलिसांनाही आश्चर्याचा धक्का बसला.

तारीख १ जुलै. रात्रीची वेळ. नागपुरातील इमामवाडा बसस्थानकातील चार्जिंग स्टेशनवर एमएच ४९/बीझेड ८२५८ क्रमांकाची एक बस उभी होती. ही बस या चोरट्याने पळवली. दरम्यान, आज राजापेठ पोलीस ठाण्यातील बीट मार्शल नाईक पोलीस कॉन्स्टेबल सारंग आदमने आणि नाईक पोलीस कॉन्स्टेबल विजय धुर्वे यांना ही बस



राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नंदा मार्केटजवळ उभी असल्याची माहिती मिळाली. बस चोरणारा चोरटा राजापेठ येथील गद्रे चौकात उभा असल्याचेही त्यांना कळले होते. बीट मार्शल आणि राजापेठ पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने तत्काळ कारवाई करीत बस आणि चोरट्याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान चोराने त्याचे नाव विष्णू गणपती नीलावर (वय २३, रा. हईत नगर, जि. रंगारेड्डी, तेलंगणा) असे सांगितले. १ जुलैला रात्री १ वाजताच्या सुमारास इमामवाडा बसस्थानक येथून चार्जिंगला असलेली बस आपण चोरली हे, आरोपीने कबूल केले. पण, त्याने पुढे दिलेली माहिती ऐकून पोलीसही चक्रावून गेले. आरोपीने आतापर्यंत तेलंगणा, आंध्रप्रदेशातून तब्बल वीस बसेस चोरल्या असून त्याने नांदेड येथील बस स्थानकावरून देखील एक बस चोरली आहे. या प्रकरणी वजिराबाद, सीसीएस पोलीस स्टेशन तिरूमला आणि इतर पोलीस ठाण्यांत गुन्ह्यांची नोंद आहे.

बसची चोरी केल्यानंतर हा चोरटा एका सुरक्षित ठिकाणी बस उभी करतो. बसचे टायर्स, बॅटरी आणि डिस्क काढून घेतो आणि विकतो. ही बस आणि त्यातील साहित्य त्याच जागी ठेवून पसार होतो. ही त्याची चोरी केल्यानंतरची कार्यपद्धती आहे. पण, पोलिसांच्या सतर्कतेमुळे ही चोरी पकडली गेली. चोरट्याही पोलिसांच्या तावडीत सापडला. सुमारे १ कोटी ५३ लाख रुपये किंमतीची ही इलेक्ट्रिक बस चोरी केल्याबद्दल नागपुरातील गणेशपेठ पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद आहे.

## पतीची हत्या करणाऱ्या सोनम रघुवंशीला मिळाला जामीन; पोलिसांची अक्षम्य चूक

**नागपूर/वृत्तसंस्था**

पुण्यातील केतन अग्रवाल हत्येचे प्रकरण आणि त्यातील आरोपी सिया गोयल, चेतन चौधरी यांचे प्रकरण चर्चेत असतानाच वर्षभरापूर्वी घडलेल्या हनिमून मर्डरची पुन्हा एकदा चर्चा होत आहे. सोनम रघुवंशीने मेघालयमध्ये तिचा पती राजा रघुवशींची हत्या केली होती. या हनिमून मर्डर प्रकरणामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली होती. या गंभीर गुन्ह्यात सोनम रघुवंशी आरोपी क्र. १ असतानाही तिला न्यायालयाने जामीन दिला. यामुळे अनेकांना धक्का बसला. पोलिसांनी अटकेचे कागदपत्र तयार करताना त्यात अक्षम्य चूक केल्याचे आता समोर आले आहे.

सोनम रघुवंशीच्या अटकेच्या कागदपत्रात अटकेचे कारण हत्या नसून वेगळेच देण्यात आले. सोनम लष्करातून पळून गेल्याचे आणि तिने भारताबाहेर गुन्हा केल्याचे कागदपत्रात नमूद करण्यात आले आहे. मेघालय उच्च न्यायालयाने सोनम रघुवंशीला जामीन मंजूर करत असताना पोलिसांनी दाखल केलेल्या दस्तऐवजाचे वाभाडे काढले आहेत. डोक्याचा भाग न वापरता हे कागदपत्र तयार केले असल्याची टीका केली. तसेच राज्य सरकारने सोनमचा जामीन रद्द करण्यासाठी दाखल केलेली याचिकाही फेटाळून लावली.

जामीन रद्द करण्याची याचिका फेटाळून लावताना न्यायमूर्ती डब्ल्यू डिएंगडोह यांनी सांगितले की, ९ जून २०२५ गाझीपूर येथील वन स्टॉप सेंटरने तयार केलेले अटकेचे कागदपत्र तपासण्यात आले. त्यावर सोनमची स्वाक्षरी आहे. हे कागदपत्र तयार करताना डोक्याचा भाग वापरलेला नाही. यात खटल्याच्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. आरोपीवर कोणते विशिष्ट आरोप आहेत, याची कोणतीही माहिती त्यात नाही.

न्यायमूर्ती डिएंगडोह यांनी या कागदपत्रातील काही मजकूर वाचून दाखवला. ज्यात लिहिले आहे, "केंद्रीय सशस्त्र दलातून तुम्ही पळून गेल्याबद्दल तुमच्यावर गुन्हा दाखल झाला आहे." तर दुसऱ्या एका उताऱ्यात लिहिले आहे, "तुम्ही विदेशात गुन्हा केल्याचा तुमच्यावर आरोप आहे." तर तिसरा उल्लेख तर अतिशय हास्यास्पद आहे. यात लिहिले, "तुम्ही तुरुंगातून सुटल्यानंतर तुमच्या निवासस्थानाची किंवा पत्त्यामध्ये केलेल्या बदलाची माहिती न दिल्याचा तुमच्यावर आरोप आहे."

## कुडाळमध्ये वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी उघड; ६ बिबट नखांसह कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त ; एकाला अटक

**सावंतवाडी/वृत्तसंस्था**



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ बाजारपेठ येथे 'मसुरकर जेम्स' या दुकानावर वनविभागाने छापा टाकून वन्यप्राण्यांच्या अवयवांची मोठी तस्करी उघडकीस आणली आहे. या कारवाईत ६ बिबट नखे, २० बिबट नखांचे अवयव, २ बिबटचे सुळे (दात) आणि वन्यप्राण्यांच्या शिंगापासून तयार केलेली ६ नखे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दुकानाचा मालक अजित वसंत मसुरकर याला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला २ दिवसांची वन कोठडी सुनावली आहे.

याबाबत वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार, वनक्षेत्रपाल यांना कुडाळ बाजारपेठ येथील मसुरकर जेम्स या दुकानात वन्यप्राण्यांच्या अवयवांची बेकायदेशीर विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे वनक्षेत्रपाल आणि वनपरिक्षेत्र अधिकारी कुडाळ यांच्या संयुक्त पथकाने दोन पंचांसमक्ष सदर दुकाची झडती घेतली. या झडतीदरम्यान वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या अनुसुची-१ मधील संरक्षित प्राणी असलेल्या बिबट्याची शिकार करून, त्यापासून मृगयाचिन्हे तयार करून विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी सावंतवाडी वनविभागाने गुन्हा नोंदवला आहे. त्याला कुडाळच्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची वन कोठडी सुनावली. सदरची मोठी कारवाई उपवनसंरक्षक सावंतवाडी मिलीश शर्मा तसेच सहाय्यक वनसंरक्षक डॉ. सुनील लाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सिंधुदुर्ग जिल्हा निसर्गसंपन्न असून येथे बिबट, रानगवा, सांबर, खवलेमांजर, पिसोरी यांसारख्या संरक्षित वन्यजीवांचा अधिवास आहे. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार या प्राण्यांची शिकार करणे, त्यांचे अवयव किंवा मृगयाचिन्हे बाळगणे अथवा त्यांचा व्यापार करणे हा गंभीर गुन्हासून यामध्ये ७ वर्षांपर्यंत कारावास आणि आर्थिक दंडाची तरतूद आहे. अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य आढळल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन उपवनसंरक्षक मिलीश शर्मा यांनी केले आहे.

## जमिनीच्या वादातून शिवसेना (शिंदे) पक्षाच्या जिल्हाप्रमुखाकडून गोळीबार

**पिंपरी/वृत्तसंस्था**

जमिनीच्या वादातून शिवसेना (शिंदे) पक्षाच्या जिल्हाप्रमुखाने पिस्तुलातून गोळीबार केला. हा प्रकार गुरुवारी मध्यरात्री सुस-नांदे रोडवरील एका बांधकाम प्रकल्पावर घडला. बावधन पोलिसांनी जिल्हाप्रमुखासह दोघांना अटक केली आहे. त्याच्याकडून एक पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

शिवसेनेचे (शिंदे) जिल्हाप्रमुख बाळासाहेब रामदास चांदेरे (वय ५४, रा. सुसगाव) आणि संदेश सतीश माने (वय ३७, रा. कात्रज-कोंढवा रोड, कोंढवा) अशी अटक आरोपींची नावे आहेत. याबाबत नागेश मोहन राठोड (वय २१, रा. नऱ्हे) यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बावधन ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी याबाबत माहिती दिली. फिर्यादी नागेश हे बुधवारी रात्री मित्रांना नऱ्हे येथील भूमकर पूल परिसरात भेटले होते. त्यावेळी एका मित्राने सुरक्षारक्षक म्हणून काम करत असलेल्या सुसगाव येथील बांधकाम प्रकल्पावर लक्ष ठेवण्यासाठी जायचे असल्याचे सांगितले. त्यानंतर तिघांना सूस येथील एका बांधकाम प्रकल्पावर सोडले. तेथे तिघे काही वेळ गप्पा मारत बसले होते.

मध्यरात्री एकच्या सुमारास तिघे बांधकाम प्रकल्पाबाहेर आले असता समोर एक मोटार येऊन थांबली. त्यातून आरोपी चांदेरे खाली उतरून बांधकाम प्रकल्पासमोर आला. चांदेरे आणि जागामालक यांच्यात जमिनीवरून वाद सुरू आहेत. या वादातून चांदेरे याने फिर्यादीसह त्यांच्या सहकाऱ्यांना शिवीगाळ सुरू केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. चांदेरे याने एकाच्या कानशिलात मारली. त्यानेही प्रतिकार करत चांदेरे याच्या कानशिलात लगावली. याचवेळी चांदेरे याने पँटच्या बाजूला हात घालून पिस्तूल बाहेर काढले. दरम्यान, आणखी एक जण दुचाकीवर तेथे आला आणि शिवीगाळ व दमदाटी करू लागला. चांदेरे याच्या हातातील पिस्तूल पाहताच तिघांनी पळ काढला. दोघे हे स्मशानभूमीच्या दिशेने तर, एकजण महामार्गाच्या दिशेने धावले. काही अंतरावर गेल्यानंतर त्यांना एक गोळी झाडल्याचा आवाज ऐकू आला.

माहिती मिळताच बावधन पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आरोपींकडून एक पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. याप्रकरणी मारहाण, शिवीगाळ, धमकी, लोकांच्या जीवितास धोका निर्माण करणे, शस्त्र कायद्याचे उल्लंघन तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक बालाजी ठाकूर तपास करीत आहेत. आरोपी चांदेरे याने केलेल्या गोळीबाराचा आवाज ऐकताच तिघांनीसुसगाव स्मशानभूमीजवळील ओढ्यातून पळ काढला. त्यावेळी पळत असतानाच एकाने डायल ११२ वर संपर्क साधून गोळीबाराची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर एका मित्राला बोलवले. तो मोटार घेऊन स्मशानभूमीजवळ आला. त्यानंतर तिघे चांदणी चौक येथे गेले. सर्वांनी बावधन पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली. बाळासाहेब चांदेरे यांनी गुरुवारी मध्यरात्री गोळीबार केल्याची माहिती समोर आली. पोलिसांना माहिती मिळताच दोघांना अटक केली आहे, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी सांगितले.

# रोनाल्डोचा वर्ल्ड रेकॉर्ड! फिफा वर्ल्डकप स्पर्धेत अशी कामगिरी करणारा ठरला जगातील पहिलाच खेळाडू

■ लंडन/वृत्तसंस्था





फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत पोर्तुगालचा स्टार खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डोचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. या स्पर्धेतील राऊंड ऑफ ३२ फेरीतील सामन्यात पोर्तुगाल आणि क्रोएशिया हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. हा सामना पोर्तुगालने २-१ ने आपल्या नावावर केला. यापैकी एक गोल हा रोनाल्डोने केला होता. दरम्यान या सामना खेळण्यासाठी मैदानात उतरताच त्याने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. ख्रिस्तियानो रोनाल्डो हा फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील बाद फेरीतील सामने खेळणारा सर्वात वयस्कर खेळाडू बनला आहे. रोनाल्डोने हा रेकॉर्ड राऊंड ऑफ ३२ फेरीत क्रोएशियाविरुद्धच्या सामन्यात आपल्या नावावर केला आहे. त्याचं वय ४१ वर्ष आणि १४७ दिवस इतकं आहे. याआधी हा रेकॉर्ड कॅमरुनच्या रॉजर मिलाच्या नावावर होता. आता रोनाल्डोचा हा वर्ल्ड रेकॉर्ड कोणता खेळाडू मोडणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

या सामन्यात पोर्तुगालला विजय मिळवून देण्यात ख्रिस्तियानो रोनाल्डोने मोलाचं योगदान दिलं. त्याने या सामन्यात १ गोल केला. यासह फिफा वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासात बाद फेरीतील सामन्यांमध्ये गोल करणारा तो सर्वात वयस्कर खेळाडू बनला आहे. मुख्य बाब म्हणजे, हा रोनाल्डोच्या फुटबॉल कारकिर्दीतील वर्ल्डकप बाद फेरीत केलेला पहिलाच गोल केला. याआधी त्याला बाद फेरीत एकही गोल करता आला नव्हता. या सामन्यात पोर्तुगालचा संघ ०-१ ने पिछाडीवर होता. त्यावेळी पोर्तुगालला पेनल्टी मिळाली. त्यावेळी रोनाल्डोने क्रोएशियाच्या गोलकिपरला चकवा देत गोल केला आणि स्कोअर १-१ ने बरोबरीत आणला. क्रोएशियाकडून ५३ व्या मिनिटाला इवान पेरिसिचने गोल करुन, क्रोएशियाला १-० ने आघाडी मिळवून दिली होती. त्यानंतर सामन्यातील ६८ व्या मिनिटाला रोनाल्डोने पेनल्टी किकला गोल केला आणि स्कोअर १-१ ने बरोबरीत आणला. हा त्याचा फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील बाद फेरीतील पहिलाच गोल ठरला. हा सामना एक्स्ट्रा टाईमला जाणार असं वाटत होतं. सामना समाप्त होण्याआधी क्रोएशियाकडून गोल करण्यात आला, त्यावेळी क्रोएशियाला वाटलं की, स्कोअर २-२ ने बरोबरीत आला आहे. पण पंचांनी पडताळणी करुन पाहिलं, त्यावेळी पंचांनी ऑफ साईडचा इशारा केला आणि हा गोल अमान्य घोषित करण्यात आला. त्यामुळे पोर्तुगालने हा सामना २-१ ने आपल्या नावावर केला.

## इंग्लंडची फायनलमध्ये धडक! दक्षिण आफ्रिकेवर मिळवला ४० धावांनी दमदार विजय

■ मेक्सिको सिटी/वृत्तसंस्था

आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील दुसऱ्या सेमीफायनलचा थरार इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. लंडनच्या ऐतिहासिक मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात दोन्ही संघांमध्ये रोमांचक लढत पाहायला मिळाली. पण शेवटी इंग्लंडने ४० धावांनी सामना जिंकला आणि अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अंतिम सामन्यात इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया हे दोन्ही संघ जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्यासाठी मैदानात उतरणार आहे.




या सामन्यात इंग्लंडचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. घरच्या मैदानावर खेळत असलेल्या इंग्लंडला हवी तशी सुरुवात करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान गोलंदाजीसमोर अवघ्या ३५ धावांवर इंग्लंडचे ३ प्रमुख फलंदाज तंबूत परतले होते. डॅनी वॅट हॉज, एलिस कॅप्सी आणि एमी जोन्स हे तिन्ही फलंदाज हवी तशी सुरुवात करून देऊ शकले नाहीत. पण त्यानंतर इंग्लंडच्या फलंदाजांनी दमदार पुनरागमन केलं. कर्णधार नेट सिव्हर ब्रंट आणि हिदर नाईट या दोन्ही अनुभवी फलंदाजांनी मिळून इंग्लंडचा डाव सांभाळला . दोघांनी मिळून १३३ धावांची विक्रमी भागीदारी केली. सिव्हर ब्रंटने ३५ चेंडूंचा सामना करत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. यासह हिदर नाईटनेही आपलं अर्धशतक पूर्ण केलं आणि इंग्लंडची धावसंख्या १६९ धावांवर पोहोचवली.

दक्षिण आफ्रिकेला हा सामना जिंकण्यासाठी १७० धावांचा डोंगर सर करायचा होता. दक्षिण आफ्रिकेलाही अपेक्षित सुरुवात करता आली नाही. कर्णधार लॉरा वॉल्वाईटकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. पण ती स्वस्तात माघारी परतली. दक्षिण आफ्रिकेकडून ताजमिन ब्रिट्सने एकाकी झुंज देत अर्धशतकी खेळी केली. पण तिला इतर कुठल्याही फलंदाजांकडून हवी तशी साथ मिळाली नाही. दक्षिण आफ्रिकेला २० षटकांअखेर ८ गडी बाद १२९ धावांपर्यंत मजल मारता आली. दक्षिण आफ्रिकेने हा सामना ४० धावांनी गमावला. पहिल्या डावात फलंदाजांनी दमदार फलंदाजी केली. तर धावांचा बचाव करताना गोलंदाजांनीही आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडली. लॉरेन बेल आणि चार्ली डीनने प्रत्येकी २-२ गडी बाद केले.

## 'हे भारतात घडलं असतं तर त्यांनी गावभर बभ्रा केला असता'

■ लंडन/वृत्तसंस्था

'हे भारतात घडलं असतं तर इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियातल्या प्रसारमाध्यमांनी राळ उठवली असती. वर्तमानपत्रांमध्ये पहिल्या पानावर बातम्या छापून आल्या असत्या. हे अमेरिकेत घडलं म्हणून कोणी त्याच्याबद्दल बोलत नाहीये', अशा शब्दांत फाफ डू प्लेसिसने आपल्या भावना व्यक्त केल्या.

अमेरिकेत सध्या मेजर लीग क्रिकेट टी२० लीग सुरू आहे. फाफ डू प्लेसिस या स्पर्धेतल्या टेक्सास सुपर किंग्स संघाचा कर्णधार आहे. या संघाची मालकी चेन्नई सुपर किंग्स संघाच्या मालकांकडेच आहे. टेक्सास संघाकडे अफगाणिस्तानचा फिरकीपटू नूर अहमद आहे. मात्र अमेरिकेने व्हिसा नाकारल्यामुळे तो यंदा या स्पर्धेत खेळू शकलेला नाही.

यासंदर्भात फाफ म्हणाला, यंदा आमच्या संघात नूर नाहीये. अमेरिकेने त्याला व्हिसा दिला नाही. हे खूपच दुर्दैवी आहे. मी एक गोष्ट नक्की सांगू इच्छितो. हे जर भारतात घडलं असतं तर इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियातल्या प्रसारमाध्यमांनी राळ उडवून गावभर बभ्रा केला असता. ही पान एकची बातमी असती. या घटनेला खूप प्रसिद्धी मिळाली असती. पण हे अमेरिकेत घडलं. त्यामुळे कोणीच त्याच्याबद्दल बोलत नाहीये. नूर २०२४-२५ असे दोन हंगाम टेक्सास संघाकडून खेळला आहे. या २ हंगामात मिळून नूरने २४ विकेट्स पटकावल्या आहेत.

यंदाच्या हंगामातही नूरची भूमिका टेक्सास संघासाठी महत्त्वाची राहिली असती. मात्र अमेरिकेने व्हिसा नाकारल्यामुळे टेक्सास संघाला डावपेचांमध्ये बदल करावे लागले. तीन हंगामात एमआय न्यूयॉर्कने दोनदा तर वॉशिंग्टन फ्रीडम संघाने एकदा जेतेपदावर नाव कोरलं आहे. फाफचा संघ जेतेपदावर नाव कोरण्यासाठी उत्सुक आहे. मात्र प्रमुख फिरकी गोलंदाज नसल्याचा फटका त्यांना बसला आहे. आयपीएल स्पर्धेत नूर चेन्नई सुपर किंग्ससाठी खेळतो.

## किंग कोहलीचा 'जलवा'; मोडला किम कार्दशियनचा सर्वात मोठा रेकॉर्ड

■ आर्लिंग्टन/वृत्तसंस्था





भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेतील अंतिम फेरीत दमदार खेळी केली होती. भारताने टी-२० वर्ल्डकपची ट्रॉफी उंचावल्यानंतर त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. त्यानंतर गेल्यावर्षी त्याने कसोटी क्रिकेटमधूनही निवृत्ती जाहीर केली होती. सध्या तो भारतीय वनडे संघाचा भाग आहे. विराट जेव्हा जेव्हा मैदानावर उतरतो, त्यावेळी त्याला खेळताना पाहण्यासाठी क्रिकेट चाहते तुफान गर्दी करतात. विराटची क्रिकेट कारकिर्द शेवटच्या टप्प्यात आहे, पण त्याची लोकप्रियता काही कमी झालेली नाही. सोशल मीडियावर त्याचे फॉलोवर्स दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. क्रिकेटच्या मैदानावर अनेक रेकॉर्ड्स मोडणाऱ्या विराटने एक्स अकाऊंटवर (ट्विटर) सर्वाधिक फॉलो केल्या जाणाऱ्या सेलिब्रिटिंच्या शर्यतीत अमेरिकन रिॲलिटी टीव्ही स्टार किम कार्दशियनला मागे टाकले आहे.

विराट कोहली हा जगभरात सर्वाधिक फॉलो केला जाणारा ११ व्या क्रमांकाचा व्यक्ती बनला आहे. सध्या एक्स अकाऊंटवर विराटचे ६९.९ मिलियन इतके फॉलोवर्स आहेत. त्याने या बाबतीत किम कार्दशियनला मागे टाकलं आहे. किम कार्दशियनचे एक्स अकाऊंटवर ६९.७ मिलियन इतके फॉलोवर्स आहेत. गेल्या दशकभरात विराट कोहलीच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. त्याने क्रिकेटच्या मैदानावर अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. त्यामुळे त्याच्या लोकप्रियतेत झपाट्याने वाढ पाहायला मिळत आहे. एक्स अकाऊंटसह इस्टांग्राम आणि फेसबूकवरही विराटच्या फॉलोवर्सची संख्या कोटींमध्ये आहे.

एक्स अकाऊंटवर सर्वाधिक फॉलोवर्स असणाऱ्या खेळाडूंच्या यादीत पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो अव्वल स्थानी आहे. तर क्रिकेट या खेळातील आणि आशिया खंडातील विराट हा एकमेव असा खेळाडू आहे, ज्याने टॉप-१५ मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. जगभरात सर्वाधिक फॉलो केल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या यादीत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा देखील समावेश आहे. एक्स अकाऊंटवर नरेंद्र मोदी यांचे १०६.९ मिलियन्स इतके फॉलोवर्स आहेत.

विराट कोहली केवळ एक्स अकाऊंटवर नाही, तर इंस्टाग्रामवर सर्वाधिक फॉलो केल्या जाणाऱ्या खेळाडूंच्या यादीत आघाडीवर आहे. त्याचे इंस्टाग्रामवर २७३ मिलियन्स इतके फॉलोवर्स आहेत. विराट हा आशिया खंडातील सर्वात लोकप्रिय व्यक्ती आहे. विराटने क्रिकेटच्या मैदानावर अनेक दिग्गजांना मागे टाकलं आहे. यासह लोकप्रियता आणि ग्लॅमरच्या बाबतीतही विराट जगभरातील अनेक सेलिब्रिटींना आव्हान देतो. आता विराट आणखी किती रेकॉर्ड मोडणार? याकडे क्रीडा प्रेमींचे आणि चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# “तिच्या व्हॅनिटी व्हॅनच्या बाहेर 3 तास…”, भर कार्यक्रमात ऐश्वर्या रायला ‘प्लास्टिक’ म्हटलं!

ऐश्वर्या रायचा चाहतावर्ग फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात आहे. विविध नामांकित आंतरराष्ट्रीय फेस्टिव्हलमध्ये ऐश्वर्याची एक वेगळीच क्रेझ आहे. अभिनेत्रीने १९९४ मध्ये 'मिस वर्ल्ड'चा खिताब जिंकला होता. तिला 'ब्युटी विथ ब्रेन' देखील म्हटलं जातं. पण, याच प्रेक्षकांच्या लाडक्या ऐश्वर्याला एका लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्याने भर कार्यक्रमात 'प्लास्टिक' म्हणून संबोधलं होतं. यानंतर बरीच कॉन्ट्रोव्हर्सी झाली. या अभिनेत्याचं नाव आहे इमरान हाश्मी. अभिनेत्याला या वक्तव्याचा नंतर पश्चाताप सुद्धा झाला. या संपूर्ण वादावर इमरानने काही वर्षांपूर्वी 'लल्लनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे.

'कॉफी विथ करण'च्या चौथ्या पर्वाच्या एका भागात इमरान हाश्मी सहभागी झाला होता. या शोमध्ये एक गिफ्ट हॅंपर जिंकण्यासाठी रॅपिड फायर राऊंड खेळवला जातो. या सेगमेंटमध्ये करण शोमध्ये सहभागी झालेल्या सेलिब्रिटींना इंडस्ट्री संदर्भात विविध प्रश्न विचारतो. याचदरम्यान, इमरानने ऐश्वर्या राय-बच्चनला 'प्लास्टिक' म्हटलं होतं. यानंतर त्याला सोशल मीडियावर प्रचंड



ट्रोल करण्यात आलं होतं. “एक हॅंपर जिंकण्यासाठी मी ऐश्वर्याला प्लास्टिक म्हणालो होतो..पण त्याचा निश्चितच मला पश्चाताप आहे”, असं अभिनेत्याने यावर सांगितलं.

मुलाखतीमध्ये इमरानला विचारण्यात आलं की, ऐश्वर्या राय-बच्चनला 'प्लास्टिक' म्हटल्याचा पश्चाताप होतोय का? या प्रश्नावर इमरान म्हणाला, “हो! मला या गोष्टीचा आजही पश्चाताप आहे. कारण, मी तिचा खूप सन्मान करतो आणि मला या वक्तव्याचा पश्चाताप कायम राहील. आता लोक खूप जास्त संवेदनशील झाले आहेत आणि सोशल मीडियावर प्रत्येक गोष्टीवर नाराजी व्यक्त केली जाते… आणि मला खरंच माझी ही चूक मान्य आहे.”

“खरंतर, हम दिल दे चुके सनम' सिनेमा प्रदर्शित झाल्यावर मी ऐश्वर्याचा खूप मोठा चाहता होतो आणि अजूनही मी तिचा फॅन आहे. मी फक्त तिला पाहण्यासाठी तिच्या व्हॅनिटी व्हॅनच्या बाहेर ३ तास उभा होतो. काही वर्षांपूर्वी माझ्या 'कसूर' सिनेमाचं शूटिंग सुरू होतं आणि तेव्हाच तिथे ऐश्वर्या सुद्धा तिच्या एका प्रोजेक्टचं शूट करत होती…पण, मी आजवर तिला भेटलेलो नाहीये. मला तिला एकदा तरी भेटायला आवडेल आणि तिला मी केलेल्या वक्तव्याचं वाईट वाटलं असेल, तर मी तिची नक्कीच माफी मागेन.” दरम्यान, २०१९ मध्ये फिल्मफेअरला दिलेल्या मुलाखतीमध्ये ऐश्वर्या म्हणाली होती की, “मी फेक आणि प्लास्टिक असल्याचं म्हटलं गेलं आहे; जे अत्यंत वाईट आहे.” या वक्तव्यामुळेच ऐश्वर्याने इमरान हाश्मीबरोबर काम करण्यास नाकारलं होतं, अशा चर्चाही रंगल्या होत्या.

## प्रसिद्ध कोरिओग्राफरची तब्येत बिघडली

प्रसिद्ध बॉलिवूड कोरिओग्राफर बॉस्को लेस्ली मार्टिस यांच्या प्रकृतीबाबत चिंताजनक बातमी समोर आली आहे. छातीत त्रास आणि अस्वस्थ वाटल्यामुळे त्यांना मुंबईतील ब्रीच कॅंडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असून, टेस्टचे रिपोर्ट नॉर्मल असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून बॉस्को कामात अत्यंत व्यस्त होते. याच दरम्यान त्यांना छातीत त्रास होऊ लागला त्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेतला. डॉक्टरांनी पुढील तपासण्यासाठी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर बॉस्को यांच्या टेस्ट आणि सिटीस स्कॅन करण्यात आले. सुरुवातीचे रिपोर्ट समाधानकारक असले तरी कोणताही धोका टाळण्यासाठी डॉक्टर त्यांना निरीक्षणाखाली ठेवले आहेत.



यासह डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. बॉस्को मार्टिस हे 'बॉस्को-सीझर' या लोकप्रिय कोरिओग्राफर जोडीतील एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांनी कहो ना… प्यार है, झूमे जो पठाण, घुंगरू, तौबा तौबा, सेनोरिटा, गल्लां गुडियां यांसारख्या अनेक सुपरहिट गाण्यांना कोरिओग्राफी केली आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबतची बातमी समोर आल्यानंतर चाहते अधिकच चिंतेत पडले आहेत.

## नेत्यानं साकारली पूजनीय व्यक्तिमत्वाची भूमिका

प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या बहुप्रतीक्षित 'खाशाबा' या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भारताला स्वतंत्र्यानंतर पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे महान कुस्तीपटू खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर हा चित्रपट आधारित आहे. १ जानेवारी २०२७ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

या चित्रपटाचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांची उपस्थिती. ते या चित्रपटात त्यांच्या हृदयाच्या अत्यंत जवळ असलेल्या एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाची भूमिका साकारणार आहेत. ते या चित्रपटात त्यांचे आजोबा शहाजी महाराजांची भूमिका साकारणार आहेत. याबाबत त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर पोस्ट करत आनंद व्यक्त केला आहे. संभाजीराजे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, "खाशाबा या चित्रपटात माझ्या हृदयाच्या अत्यंत जवळ



असणाऱ्या पूजनीय व्यक्तिमत्वाची भूमिका साकारण्याची मला संधी मिळाली. नुकताच या चित्रपटाचा टीजर प्रदर्शित झाला असुन १ जानेवारी २०२७ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. भारताला ऑलिम्पिक मध्ये पहिले पदक मिळवून देणाऱ्या ऑलिम्पिकवीर पैलवान खाशाबा जाधव यांच्या संघर्षमयी जीवनचरित्रावरील हा चित्रपट असून यामध्ये माझ्या वैयक्तिक आयुष्यात देखील माझ्या हृदयाच्या अत्यंत जवळ असणाऱ्या ऐतिहासिक व्यक्तीमत्वाची भूमिका साकारण्याची संधी मला मिळाली, याचे मला अत्यंत समाधान आहे. सर्वांनी हा टीजर जास्तीतजास्त प्रसारित करावा व आपल्या देशाची मान अभिमानाने उंचावणाऱ्या पैलवान खाशाबा जाधव यांच्या कार्याची माहिती घेण्यासाठी हा चित्रपट अवश्य चित्रपटगृहात जाऊन पाहावा.

# आमिर खान रविवारी ५ जुलै रोजी राहत्या घरीच तिसऱ्यांदा अडकणार विवाहबंधनात, कुटुंबियांच्या उपस्थितीत पार पडणार लग्नसोहळा

बॉलीवूड अभिनेता आमिर खान त्याच्या व्यावसायिक आयुष्यासह खासगी आयुष्यामुळेही चर्चेत असतो. गेल्या काही दिवसांपासून तो त्याच्या लग्नामुळे चर्चेत आहे. लवकरच आमिर खान तिसऱ्यांदा विवाहबंधनात अडकणार असल्याची चर्चा आहे. वृत्तांनुसार, तो त्याची प्रेयसी गौरी स्प्रॅटबरोबर ५ जुलै रोजी लग्न करणार आहे. मात्र, लग्नासाठी बॉलीवूडमधील लोकप्रिय कलाकारांना बोलवण्यात येणार नसून कुठलाही मोठा सोहळा होणार नसल्याचं म्हटलं जात आहे.

आमिर खान त्याचं तिसरं लग्न अत्यंत साधेपणाने आणि मोजक्या लोकांच्या उपस्थितीत करण्याच्या तयारीत आहे. स्क्रीनच्या वृत्तानुसार, आमिर आणि गौरी स्प्रॅट मुंबईतील वांद्रे येथील आमिरच्या निवासस्थानी लग्नाची अधिकृत नोंदणी करणार आहेत. यानंतर एक छोटेखानी विवाहसोहळा पार पडणार असून, या खास समारंभाला दोघांचे कुटुंबीय आणि अतिशय जवळचे मित्रमंडळीच उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे हे लग्न पूर्णपणे खासगी, साध्या पद्धतीने आणि जवळच्या व्यक्तींच्या सान्निध्यात पार पडणार असल्याचं सांगितलं जात आहे.

या विवाहसोहळ्याला आणखी खास आणि भावनिक बनवणारी बाब म्हणजे, आमिर खान आणि गौरी स्प्रॅट यांची चारही मुलं या लग्नात असणार आहेत. यावेळी आमिर आणि त्याची पहिली पत्नी रीना दत्ता यांची मुलं अभिनेता जुनैद खान आणि आयरा खान, दुसरी पत्नी किरण राव आणि मुलगा आझाद, तसंच गौरी यांच्या मुलाचाही समावेश आहे. या चौघांच्या उपस्थितीमुळे आणि सहभागामुळे हा विवाहसोहळा अधिक भावनिक आणि स्मरणीय ठरणार असल्याचं सांगितलं जात आहे.



आमिर खान आणि गौरी स्प्रॅट यांची पहिली भेट बंगळुरूमध्ये आमिरची चुलत बहीण नुझहत खान हिच्यामार्फत झाली होती. त्यानंतर दोघांनी जवळपास वर्षभर एकमेकांना डेट केलं. गेल्या वर्षी मार्चमध्ये, त्याच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त त्याने माध्यमांशी संवाद साधताना प्रथमच गौरीची त्याची गर्लफ्रेंड म्हणून ओळख करून दिली होती. सध्या दोघेही मुंबईतील वांद्रे येथील आमिरच्या निवासस्थानी एकत्र राहत आहेत. दरम्यान, गेल्या महिन्यात आमिरने स्वतः ५ जुलै रोजी गौरीबरोबर विवाहबंधनात अडकणार असल्याची माहिती दिली होती.

एकदा गौरीबरोबर लग्न करण्याचा विचार आहे का, असा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर आमिरने मिश्कील अंदाजात उत्तर देत म्हटलेलं की, “या वयात लग्न करणं मला शोभत नाही.” त्यानंतर मात्र त्याने कबुली दिलेली आणि म्हणालेला, “गौरीबरोबर आता माझं आयुष्य खूप स्थिर झाल्यासारखं वाटतं”.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तुपकरांच्या नेतृत्वात कर्जमुक्तीचा लढा बळकट करणार! क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पुण्यातील बैठकीत राज्यातील पदाधिकाऱ्यांचा एकमुखी निर्धार!

बुलढाणा/बुलढाणा

फसव्या सरकारने अटी शर्तीचा घोळ घालून केलेली कर्जमाफी फसवी आहे. जोपर्यंत सरसकट कर्जमुक्ती होत नाही तोपर्यंत रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वातील कर्जमुक्तीचा लढा आणखी बळकट आणि राज्यव्यापी करण्याचा निर्धार क्रांतिकारी शेतकरी संघटनेने केला आहे. पुण्यातील कोथरूड येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या राज्यभरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक रविकांत तुपकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष राजकुमार कसबे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी कर्जमुक्तीचा लढा आणखी तीव्र करण्याचा एकमुखी निर्धार पदाधिकाऱ्यांनी केला.आगामी काळात राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या संघटनात्मक बांधणीचे अभियान सुरू करायचे आहे, त्याविषयी पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यात आली. बैठकीत राज्यातील काही प्रमुख नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.यात क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी चैत्राली शेलार यांची तर नांदेडच्या हिमायतनगर येथील सौ.पूजा चव्हाण यांची मराठवाडा विभागीय महिला अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पुण्यातील कोथरूड येथील गणेश हॉल येथे पार पडलेल्या बैठकीला प्रकृती अस्वास्थ्यामुळे रविकांत तुपकर उपस्थित राहू शकले नाही.ङ्कङ्करविकांत तुपकर यांनी राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी उभारलेला कर्जमुक्तीचा लढा आता थांबणार नाही. राज्यभरातील शेतकरी क्रांतिकारी शेतकरी संघटनेकडे आश्वासक नजरेने पाहत आहे. तुपकरांच्या नेतृत्वात राज्यभरातील शेतकरी रस्त्यावर उतरेलङ्कङ्क असा इशारा प्रदेशाध्यक्ष राजकुमार कसबे यांनी बैठकीत बोलतांना दिला. माँसाहेब जिजाऊंची जन्मभूमी असलेल्या बुलडाणा जिल्ह्यातून सुरू झालेल्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा संपूर्ण राज्यभरात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात विस्तार झाला आहे. पुढील काही दिवसांत संपूर्ण राज्यात जिल्हा आणि तालुकापातळीवर संघटनात्मक बांधणीचे अभियान संघटनेच्यावतीने राबविण्यात येणार असल्याचेही प्रदेशाध्यक्ष राजीवकुमार कसबे म्हणाले. या बैठकीला क्रांतिकारी राज्य समन्वयक सचिन पांडुळे,राज्य कार्याध्यक्ष राजेंद्र मोरे, राज्य उपाध्यक्ष जयवंत दहिभाते,बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, राज्य कार्यकारणी सदस्य भाऊसाहेब मुंढे, धाराशिव जिल्हाध्यक्ष भास्कर वारे, सांगली जिल्हाध्यक्ष अप्पासाहेब शिंदे , युवा नेते श्रीराम चलवाड, सांगली युवा



जिल्हाध्यक्ष मयूर गायकवाड, सुनील दाशाल, मल्हारी कांबळे, युवा नेते अजित गडदे, कांतीलाल शिंदे,सोलापूर जिल्ह्याचे युवा नेते शिवराम गायकवाड, अमोल घुमरे,लातूर चे दत्ता किन्हीकर , सावन गवळी,लातूर युवा जिल्हाध्यक्ष प्रज्योत हुडे, विशाल ढोबळे, बिभीषण शिंदे, प्रभाकर मजगे यांच्यासह राज्यभरातून मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होत

# जळगाव जामोदमध्ये मध्यरात्री जुगार अड्ड्यावर पोलिसांचा धडाका!




जनसंचलन-जळगाव जामोद

शहरात मध्यरात्रीच्या सुमारास पोलिसांनी जुगार अड्ड्यावर धडक कारवाई करत मोठा डाव उधळून लावला आहे. जळगाव जामोद ते बऱ्हाणपूर रोडलगत असलेल्या स्वोंद धाब्याच्या पाठीमागील टिनशेडमध्ये ताश पत्त्यांवर पैशांची हारजितीचा ङ्गएक्का-बादशाहफ नावाचा जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. याच माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक सचिन बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पंचांसह सापळा रचत मध्यरात्री सुमारे १.१० वाजता छापा टाकला. पोलिसांचा छापा पडताच जुगार खेळणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. काही जणांनी अंधाराचा फायदा घेत टिनशेडच्या मागील शेतातून पळ काढला, तर पोलिसांनी पाठलाग करून ५ जणांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्यांमध्ये शेख करिम शेख अमीर, दीपक नारायण हिस्सल, वसीम खान मेहमूद खान, शेख गफुर शेख अमीर आणि जावेद खान गुलाब खान यांचा समावेश आहे. आरोपींच्या अंगझडतीत हजारो रुपयांची रोकड मिळून आली. तसेच डावातील रक्कम मोजली असता ५३ हजार ३५० रुपये आढळून आले. घटनास्थळावरून एकूण ८० हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल, रोख रक्कम आणि ५२ ताश पत्ते पोलिसांनी पंचांसमक्ष जप्त केले. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, अंधाराचा फायदा घेत पसार झालेल्या ७ ते ८ जणांचा पोलीस शोध घेत आहेत. जळगाव जामोद पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध जुगार अड्डे चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## डॉ. होमीभाभा परीक्षेत सहकार विद्या मंदिरचा अमेय चमकला....

# कृती संशोधनात रौप्य पदक पटकावून बुलढाण्याचा मान वाढवला!

**जनसंचलन बुलढाणा**

शिक्षण क्षेत्रातून बुलढाण्यासाठी अभिमानास्पद बातमी समोर आली आहे. मुंबई सायन्स टीचर्स असोसिएशनतर्फे घेण्यात आलेल्या डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेत सहकार विद्या मंदिर, बुलढाणा येथील इयत्ता सहावीचा विद्यार्थी चि. अमेय आनंद महाजन याने दमदार कामगिरी करत रौप्य पदक पटकावले आहे. ही परीक्षा तीन स्तरांमध्ये घेतली जाते. पहिल्या स्तरात अमेयने ६९ गुण मिळवले, तर दुसऱ्या स्तरात २२.५ गुण मिळवत त्याने तृतीय स्तरासाठी म्हणजेच मुलाखतीसाठी आपली निवड निश्चित केली. तिसऱ्या स्तरावर अमेयने मया विषयावर कृती संशोधन सादर केले. या उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर त्याने रौप्य पदक पटकावून



शाळेचे, शिक्षकांचे आणि बुलढाणा शहराचे नाव उज्वल केले. अमेयच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर, प्राचार्य, मुख्याध्यापिका आणि शिक्षकवृंदांनी त्याचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. अमेयने आपल्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, मुख्याध्यापिका आणि सर्व शिक्षकवृंदांना दिले आहे. बालवयात विज्ञान क्षेत्रात घेतलेली ही झेप निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

## २० कोटी रुपयांच्या ऑफरचा दावा खोटा!

# आमदार धीरज लिंगाडेंचे संजय राऊतांना प्रत्युत्तर

**जनसंचलन-बुलढाणा**

अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे यांनी २० कोटी रुपयांच्या ऑफर संदर्भात करण्यात आलेला दावा फेटाळून लावत, खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्यावर आक्षेप नोंदविला आहे. कोणत्याही प्रकारची आर्थिक ऑफर आलेली नसून, हे वक्तव्य खोटे असल्याचे त्यांनी रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. यापूर्वी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना खासदार संजय राऊत यांनी, आमदार, खासदार आणि कार्यकर्त्यांची फोडाफोड सुरू असून, २० ते ५० कोटी रुपयांपर्यंतच्या ऑफर दिल्या जात असल्याचा आरोप केला होता. महाविकास आघाडीतील एका आमदाराला २० कोटी देण्यात रुपयांची ऑफर आल्याची माहिती असून, ते आमदार लिंगाडे असल्याचे सांगितले जात असल्याचेही त्यांनी म्हटले होते. तसेच, अशा प्रकारचे राजकारण थांबविण्याचे आवाहनही त्यांनी केले होते. या पार्श्वभूमीवर आमदार धीरज लिंगाडे यांनी पत्रकार परिषद घेऊन संजय राऊत यांच्या दाव्याचे खंडन केले. राऊत यांचे वक्तव्य ऐकून आश्चर्य वाटले. मला कोणतीही ऑफर आलेली नाही. हे विधान पूर्णपणे खोटे असून, ते राजकीय वक्तव्य म्हणून करण्यात आले असावे, असे ते म्हणाले. मी यापूर्वी शिवसेनेत होतो आणि काँग्रेसच्या एबी फॉर्मवर अमरावती पदवीधर मतदारसंघातून निवडून आलो आहे. सध्या फोडाफोडीचे राजकारण दोन्ही शिवसेनांमध्ये सुरू आहे. त्याचा इतर पक्षांशी कोणताही संबंध नाही. सकाळी या वक्तव्याची माहिती मिळाली. संजय राऊत यांची भेट झाल्यानंतर याबाबत त्यांनाच विचारणार आहे, असेही आमदार लिंगाडे यांनी सांगितले.

# मुंबईत पावसाचा धुमाकूळ; लोकल वाहतूक विस्कळीत, दुपारनंतर आणखी गंभीर स्थिती, मुख्यमंत्र्याकडून महत्त्वाचं आवाहन

**वृत्तसंस्था-मुंबई**

मुंबई शहर आणि परिसरात मागील काही तासांपासून पावसाने धुमाकूळ घातला असून जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबई लोकलच्या तिन्ही मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून अनेक गाड्या उशिराने धावत आहेत. अशातच काही वेळापूर्वी कांजूरमार्ग आणि भांडूप स्थानकादरम्यान ओव्हरहेड वायरला प्लास्टिक अडकल्यामुळे या दरम्यान धीम्या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. ओव्हरहेड वायरवरील प्लास्टिक हटवण्याचं काम सुरू असून लवकरच वाहतूक पूर्ववत होईल, अशी माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाने संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. या परिसरात पुढील काही तास अतिमुसळधार पावसाचा अंदाज असून ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पावसाची स्थिती पाहता राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मुंबईतील सर्व खासगी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना घरातून काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसंच शासकीय आणि निमशासकीय (अत्यावश्यक सेवा वगळून) कर्मचाऱ्यांना दुपारनंतर अर्ध्या दिवसाची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मुंबई शहरासह परिसरात कोसळत असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना आवाहन केलं आहे. इङ्ख्राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणा कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहेत. नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. अत्यावश्यक काम असल्याशिवाय प्रवास





करू नये. प्रशासनाने जारी केलेल्या सूचना आणि सतर्कतेच्या निर्देशांचे पालन करावे. दुपारी यापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे सगळ्यांनी पूर्णतः प्रवास आणि घराबाहेर पडण्याचे टाळावे, असं मुख्यमंत्री म्हणाले. हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना आवाहन केलं आहे. अत्यावश्यक कामाशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडणं टाळावं. झाडे, जीर्ण इमारती, होर्डिंग्ज, विद्युत खांब तसेच इतर धोकादायक ठिकाणांपासून सुरक्षित अंतर राखावे. झाडांखाली वाहने उभी करण्याचे टाळावे. समुद्रकिनारी तसेच पाणथळ भागात जाणे टाळावे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत माध्यमांद्वारे प्रसारित करण्यात येणाऱ्या सूचना व इशाऱ्यांचे पालन करावे. प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदतीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १९१६ या मदतसेवा क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन पालिकेने केलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८